चित्रसंच ३.

रविवार होता आणि शाळेला सुट्टी होती. चिंटूने खिडकीतून घराबाहेर डोकावले. थोडीशी ढगाळ हवा होती. पाऊस पडला तर काय मजा येईल असे त्याला वाटले. आईला विचारले पाहिजे बाहेर खेळायला गेले तर चालेल का? चिंटूच्या डोक्यात आले आपण आपल्या दुचाकी सायकल वरून आपल्या मित्राकडे जाऊन खेळूया. चिंटूने आईला विचारले, "आई मी गोट्याकडे सायकल वरून जाऊ का?" आई म्हणाली, "चिंटू, तू जा पण दुपारी जेवायच्या आधी घरी परत ये."

मायबोली आयडी: lagwankars

पाल्याचे नाव: साची लागवणकर

वय: ९४